# गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक

## पोलीसांना माहिती देणे व त्यांचे अन्वेषण करण्याचे अधिकारी

## फौ.दं.प्र.सं. प्रकरण १२

फौजदारी दंड प्रक्रीया संहीता १९७३ मधील प्रकरण १२ मध्ये कोणत्याही स्वरूपाचे दखलपात्र / अदखलपात्र अपराध व अकस्मात मृत्युची माहीती देणे, त्यांची नोंद करणे तसेच त्यांचे अन्वेषण करण्याची प्रक्रीया व पोलीसांचे तपासाबाबतचे अधिकार या बाबत कलम १५४ ते १७७ अन्वये कायदेशिर तरतुदी करण्यात आल्या आहेत.

गुन्हयाचा तपास कायदेशीर पध्दतीने पुर्ण करून दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणेसाठी या प्रकरणातील तरतुदी समजुन घेणे प्रत्येक तपासी अधिकारी / अंमलदार यांना आवश्यक आहे.

# प्रथम खबर

- कलम १५४ दखलपात्र अपराधाची वर्दी :- पोलीस स्टेशन मध्ये पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी प्रथम खबर कशी नोंदवुन घ्यावी याची पध्दत सांगणारे मार्गदर्शक कलम आहे. यात एकुण तीन पोटकलमे असुन पोटकलम १ व २ मध्ये खबर लेखी लिहुन घेणे, ती वाचुन दाखविणे, तिचेवर खबर देण्या-याची सही घेणे, तिचा गोषवारा सरकारी पुस्तकात नोंदवुन त्याची एक प्रत विनामुल्य देण्यात यावी असे नमुद केले आहे.

पोटकलम ३ मध्ये खबर नोंदवुन घेण्यास नकार दिला तर अशी तक्रार पोस्टाने घटक प्रमुखांना पाठविण्याचा अधिकार खबर / तक्रार देणा-यास आहे., त्यावर घटक प्रमुख खबर लिहुन न घेणा-या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करून तक्रारी संबधी दुस-या अधिका-याला अन्वेषणाचा आदेश देवु शकतात.

# प्रथम खबर

टिप क्र. १ :- पोटकलम १ अन्वये दिलेली खबर हि दखलपात्र अपराधाची असणे आवश्यक आहे. त्याला एफआयआर किंवा पहीली खबर म्हणतात. परंतु अस शब्दप्रयोग फौ.प्र.दं.सं. मध्ये कोठेही नमुद नाही. या कलमान्वये दिलेल्या दखलपात्र अपराधाची तक्रार हि नोंदविलीच पाहीजे त्याला दुसरा पर्याय नाही.

टिप क्र. २ :- कायद्याप्रमाणे दखलपात्र अपराध घडताचा त्वरीत खबर देणे महत्वाचे आहे. त्यामुळे घटनेची सत्यता व प्रामाणिकपणा दिसतो, खोटा आरोपी दर्शविला जात नाही. परंतु काही कारणास्तव उशीर झाल्यास त्याचा खबरी मध्ये उल्लेख करणे गरजेचे आहे. (अशा प्रकारात उशीराच्या कारणाची पडताळणी करावी ते समाधानकारक असणे गरजेचे आहे.)

टिप क्र. ३ :- खबरीमध्ये घटनेचा सर्व तपशिल असणे महत्वाचे नाही. मुळ उद्देश तपासाची चक्रे फिरवणे हा आहे.

# प्रथम खबर

टिप क्र. ४ :- तक्रार दाखल करतांना ती खोटी अगर खरी आहे याचेत वेळ न घालवता ती दाखल करणे पोलीसांचे कर्तव्य आहे. ही बाब तपासाअंती निष्पन्न करावी.

टिप क्र. ५ :- गुन्हा दुस-या पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडला आहे हि सबब सांगणे चुकीचे आहे. खबर देणा-याला त्याचे ज्ञान नसते. त्यामुळे गुन्हा कोठेही घडला असला तरी खबर नोंदवुन घेवुन तपास संबधीत पोलीस स्टेशन कडे वर्ग करता येतो.

टिप क्र. ६ :- खबर फोनव्दारे दिली असेल तर संबधीताने कळविलेल्या माहीती मध्ये दखलपात्र अपराध घडला आहे हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. अन्यथा ती प्रथमखबर होवु शकत नाही.

टिप क्र. ७ :- खबर हि फिर्यादी स्वता पोलीस ठाण्यात हजर राहुन, पोस्टाने अर्ज करून, टेलीफोनव्दारे, पोलीसांनी बातमीदारांमार्फत केलेल्या कार्यवाही नंतर स्वता म.पो.का.क. ६४(ब) प्रमाणे तसेच आरोपीने गुन्हा केल्यानंतर स्वता अपराधाची माहीती देणे या सर्व प्रकारातुन मिळु शकते

# प्रथम खबर

टिप क्र. ८ :- प्रथम खबरीमध्ये अपराध कोणी केला, कोठे केला, का केला, कसा केला, त्यात साक्षीदार आहेत का हे मुद्दे समाविष्ठ होणे गरजेचे आहे. कारण प्रथम खबर हि तपासाचा मुळ पाया असते. त्याला अनुसरून साक्षीदारांची साक्ष न्यायालयात झाली तरच गुन्हा सिध्द होणेस मदत होते.

टिप क्र. ९ :- प्रथम खबर हा भा.पु.का.क. ७४ प्रमाणे सार्वजनिक दस्ताऐवज असतो. त्याची प्रत मिळणे हा नागरीकांचा तसेच आरोपीचाही हक्क असतो.

टिप क्र. १०:- खबर हि अपराधाची माहीती असणारी व्यक्ती, पिडीत, आरोपी अथवा त्यासंबधी चौकशी करणारा पोलीस अधिकारी / अंमलदार देउ शकतो. खबर देणा-याची सही खबरीवर घेणे आवश्यक आहे.

टिप क्र. ११ :- आरोपीने गुन्हा केल्यानंतर स्वता पोलीस ठाण्यात येवुन खबर दिल्यास अशा खबरीचे भा.पु.का.क. अन्वये तिन भाग पडतात ते पुढीले प्रमाणे

१. कलम २१ :- सांगीतलेली अधीची हकीगत (ग्राहय निवेदन )

२. कलम २५ :- मी खुन केला (अग्राहय कबुली जबाब)

३. कलम ८ व २७ :- फिर्याद देणे, माल काढुण देणे (ग्राहय वर्तन)

# फौ.दं.प्र.सं. १९७३ च्या प्रकरण १२ मधील कायदेशीर तरतुदी

टिप क्र. १२ :- कलम १५४(१) मध्ये दखलपात्र अपराधाची प्रथम खबर असा उल्लेख केला आहे. याचा अर्थ आयपीसी मधील दखलपात्र अपराध तसेच इतर कायद्यान्वयेचा अपराध असा होतो. दखलपात्र अपराधा म्हणजे फौ.दं.प्र.सं. कलम २(ग) प्रमाणे न्यायालयाचे परवानगी शिवाय तपास करण्याचा पोलीसांना अधिकार असलेले अपराध होय, आयपीसी नुसार मृत्युदंड, जन्मठेप किंवा सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेले अपराध हे दखपात्र-बिगर जामीनाचे व सेशन कमीट आहेत. तसेच तीन वर्ष आणि जास्तीत जास्त सात वर्षा पेक्षा कमी शिक्षा असलेले अपराध हे दखलपात्र - जामीनपात्र व ज्युडीशिअल (प्रथम न्यायदंडाधिकारी) यांचे पुढे चालणारे असतात.

टिप क्र. १३ :- फिर्याद आणि पहिली खबर या मध्ये बराचा फरक आहे. फिर्यादीची व्याख्या फौ.द.प्र.सं. कलम २(६) मध्ये आहे तर खबरीची व्याख्या फौ.द.प्र.सं. कलम १५४ मध्ये आहे. फिर्याद हि नेहमी खाजगी स्वरूपात न्यायालयापुढे दिली जाते तर खबर हि पोलीसांपुढे दिली जाते. त्यामुळे पोलीस ठाण्यात दखल पात्र अपराध दाखल करतांना खबर हाच शब्द वापरावा

# प्रथम खबर

**टिप क्र. १४ :-** प्रथम खबरीवर पोलीस स्टेशनचे सिल नाही म्हणुन ती अयोग्य ठरत नाही परंतु तिचेवर न्यायालयाला प्राप्त झाल्याचा शेरा असणे आवश्यक असते.

**टिप क्र. १३ :-** खबरी / फिर्यादी मध्ये घटनेबाबत किरकोळ विसंगती असल्याने ती अविश्वसनीय ठरत नाही. त्याची पुर्ण सत्यता पडताळणे हा तपासाचा भाग असतो.

**टिप क्र. १४ :-** प्रथम खबरी मध्ये दखलपात्र अपराध दिसुन येत नसल्यास उच्च न्यायालयास अशी प्रथम खबर रद्द करता येते. परंतु पोलीसांनी एखाद्या दखलपात्र अपराधाचे अन्वेषण उशीराने सुरू केले म्हणुन प्रथम खबर रद्द करता येत नाही.

# अदखलापत्र अपराध व अन्वेषणाचा अधिकार

**कलम १५५ अदखलपात्र अपराधाची नोंद व त्याचे अन्वेषण :-** या कलमान्वये पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात घडलेल्या अदखलपात्र अपराधाची नोंद शासनाने विहीत केलेल्या रजिस्टर मध्ये घेण्यात येते. अशा अदखलपात्र अपराधामध्ये न्यायालयाचे पुर्व परवानगीशिवाय पोलीसांना अन्वेषण करण्याचे अधिकार नसलयाने तक्रारदाराला न्यायासाठी न्यायालयात दाद मागण्याची सुचना करावी. या कलमाचे पोट कलम ३ नुसार न्यायालयाची परवानगी प्राप्त झाले नंतर दखलपात्र अपराधा प्रमाणे पोलीस अन्वेषण करू शकतात. पोट कलम ४ नुसार अदखपात्र गुन्हयाच्या प्रकारामध्ये एक जरी दखलपात्र अपराध घडला आहे असे निदर्शनास इतर अदखपात्र अपराध देखील दखलपात्र अपराधात मोडतात

**कलम १५६ दखलपात्र अपराधाचे अन्वेषण करण्याचा पोलीसांचा अधिकार :-** या कलमान्वये पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दखलपात्र अपराधाचे कायदेशिर अन्वेषण करण्याचा अधिकार पोलीसांना प्राप्त होतो.

# घटनास्थळ पंचनामा

**कलम १५७ अन्वेषणाची प्रक्रीया :-** या कलमान्वये तपासी अधिकारी / अंमलदार यांना गुन्हयाचे घटनास्थळी जावुन गुन्हयाचे अन्वेषणाची प्रक्रीया सुरू करण्याचा अधिकार आहे (उदा. घटनास्थळ पंचनामा, घटनास्थळी मिळुन येणारे भौतिक, जैविक व इतर पुरावे तपासकामी जप्त करणे, आरोपीतास अटक, साक्षीदारांचे जबाब नोंदविणे ) या कलमातील **पोटकलम १ च्या उपखंड** क नुसार अपराध गंभीर स्वरूपाचा नाही. व अपराध करणा-याच्या नावानिशी खबर देण्यात आली आहे. अशा प्रकारात तपासी अंमलदाराला घटनास्थळावर जावुन अन्वेषण करण्याची आवश्यकता नाही असे नमुद केले आहे.

**कलम १५८ अहवाल कसा सादर करावा:-** या कलमान्वये कलम १५७ खाली प्रत्येक अहवाल राज्य शासनाने तसे निदेश दिल्यास शासनाचे आदेशानुसार नियुक्त केलेल्या वरीष्ठ अधिका-याच्या मार्फतीने न्यायालात सादर कारवा.

# साक्षीदारांची तपासणी

**कलम १५९ अन्वेषण किंवा प्रारंभिक चौकशी करण्याचा न्यायालयाचा अधिकार :-** या कलमान्वये कलम १५८ नुसार अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या प्रकरणाचे अन्वेषण करण्याचा / चौकशी करण्याचा अन्यथा असे प्रकरण निकालात काढण्याची कार्यवाही करण्याचा न्यायालयाला अधिकार आहे.

**कलम १६० साक्षीदारांना समक्ष हजर राहण्यास फर्माविण्याचा अधिकार:-** या कलमान्वये तपासी अधिकारी / अंमलदार अपराधाशी संबधीत साक्षीदारांना अन्वेषणासाठी पोलीस स्टेशनमध्ये हजर राहण्यास फर्मावु शकतो. परंतु १५ वर्षा खालील व ६५ वर्षा वरील पुरूषाला किंवा स्त्रीला किंवा मानसिकदृष्टया / शारिरीकदृष्टया विकलांग व्यक्तीला तिचे राहणेच्या ठिकाणाव्यतीरीक्त इतर ठिकाणी हजर राहणे बाबत फर्मावु शकत नाही

# साक्षीदारांची तपासणी

**कलम १६१ पोलीसांना साक्षीदाराची तपासणी करण्याचा अधिकार :-** या कलमान्वये गुन्हयांशी संबधीत अथवा ज्याला गुन्हयाची माहीती आहे त्या माहीतीमुळे आरोपीला शिक्षा होउ शकते अशा साक्षीदारांची तपासणी करण्याचा व दिलेल्या साक्षीवरुन अभिलेख / जबाब घेण्याचा अधिकार आहे. परंतु या कलामातील पोट कलम १ ते ३ नुसार लैगिंक अत्याचाराने पिडीत असलेल्या महीलचा जबाब मात्र महिला पोलीस अधिकारी किंवा अंमलदार यांनीच नोंदवावा या कलमान्वये दिलेल्या कलमान्वये दिलेल्या जबाबचे ऑडीओ / व्हिडीओ रेकॉर्डीक करावे.

# सक्षीदारांचे जबाब

**कलम १६२ पोलीसांना दिलेले जबाब स्वाक्षरित करावयाचे नाही. त्या जबाबाचा पुरव्यात उपयोग करण्याचा अधिकारः-** या कलमान्वये तपासी अधिकारी / अंमलदार यांचे समक्ष साक्षीदाराने दिलेल्या जबाबावर सही घेवु नये. या जबाबाचा पोलीस आरारेपीताविरूध्दचा पुरावा म्हणुन संबधीत गुन्हयाचे तपासात वापरतील. साक्षीदाराने दिलेल्या जबाबाचा उपयोग हा न्यायालयात गुन्हयाची सत्यता पडताळणेसाठी होतो. त्यामधील विरोधाभास न्यायालयासमक्ष मांडणेसाठी भा.साक्ष पुरावा कायद्यान्वये आरोपी पक्ष त्याची उलटतपासणीसाठी घेवु शकतो.

# साक्षीदार

**कलम १६३ साक्षीदाराला कोणतेही प्रलोभन दाखवाचे नाही:-** या कलमान्वये गुन्हयाचे तपासादरम्यान तपासी अंमलदार अथवा इतर कोणत्याही व्यक्तीने साक्षीदार यांला भा.साक्षीपुरवा अधिकनियम मधील कलम २४ मध्ये उल्लेखीत केलेले कोणतेही प्रलोभन अथवा धमकी देता कामा नये. गुन्हयाची संबधीत साक्षीदाराला जी माहीती असेल तेवढीच माहीती त्याचे जबाबात नोंदवावी. तो जबाब साक्षीदाराला मान्य असला पाहीजे. त्याव्यतिरीक्त इतर माहीती जबाबात नोंदवु नये.

# कबुली जबाब

**कलम १६४ कबुली जबाब :-** या कलमान्वये कोणताही महानगर दंडाधिकारी अथवा न्यायदंडाधिकारी यांना तपासादरम्यान अथवा तपास सुरू होण्यापुर्वी त्यांचे समोर कबुली देणारे व्यक्तीचा कबुली जबाब नोंदविण्याचा अधिकार आहे. त्यांनी कबुली जबाबाचे ऑडीओ व्हिडीओ रोकॉर्डीगसह आरोपीताचे वकीलासमोर नोंदविणे आवश्यक आहे. असा कबुली जबाब संबधीत व्यक्तीने स्वखुशीने दिला पाहीजे. याची खात्री कबुली जबाब नोंदविणारे दंडाधिकार-यांनी केली पाहीजे. तसेच जबाब नोंदविण्यापुर्वी संबधीत व्यक्तीला त्याने दिलेला कबुली जबाब नंतर बदलता येणार नाही. साक्ष देतांना त्याने कबुली जबाबाचे विरूध्द साक्ष दिल्यास त्याचेवर कायदेशिर कारवाईल केली जाईल याची जाणीव करून दिली पाहीजे. कबुली जबाब देण्यास इच्छुक नसणारे व्यक्तीला दंडाधिकारी पोलीसांचे ताब्यात देणार नाही. कबुली जबाब नोंदविले नंतर त्याचेवर कबुली जबाब देण्या-याची स्वाक्षरी घेतली पाहीजे तसेच त्या खाली संबधीत दंडाधिकारी यांनी सदर जबाब माझे समक्ष व मला ऐकु येईल अशा आवाजात संबधीताने कथन केला आहे.

# कबुली जबाब

**कलम १६४ :-** कबुली जबाब स्वच्छेने दिला असुन नंतर कबुली जबाब देणा-याने तो मान्य न केल्यास त्याचे विरूध कायदेशिर कारवाई करण्यात येईल अशी त्याला समज दिली आहे. असे टिपण करून त्या खाली दंडाधिकारी यांनी समक्ष म्हणु स्वाक्षरी केली पाहीजे.

तसेच लैगिंक अत्याराातील पिडीताचा कबुली जबाब घटनेनंतर शक्य तितके लवकर दंडाधिका-यासमक्ष नोंदविला पाहीजे. ताप्तुरत्या व कायमस्वरूपी मानसिक / शारिरीक विकलांग असलेल्या व्यक्तीचा जबाब नोंदवितांना दुभाषी अथवा त्याला असलेल्या त्रासाचे तज्ञ ज्यांना जबाब देणा-याची भाषा समजते त्यांचे समक्ष ऑडीओ / व्हिडीओ रेकॉर्डींगसह नोंदविला पाहीजे. पुरावा अधिनियमानुार कबुली जबाब देणा-याची उलट तपासणी आरोपी पक्षाला घेता येईल. त्यावेळी रेकॉर्डीग करण्याची आवश्यकता नाही.

अन्य दंडाधिका-याने कबुली जबाब नोंदविला असेल तर त्याची प्रत व रेकॉर्डींग संबधीत न्यायकक्षेतील दंडाधिका-यांकडे जबाब घेणा-या दंडाधिका-यांनी पाठविला पाहीजे.

# पिडीतेची वैद्यकीय तपासणी

**कलम १६४ क  बलात्काराची बळी पडलेल्या व्यक्तीची वैद्यकीय तपासणी :-** या कलमान्वये बलात्कारास बळी पडलेल्या महिलेची वैद्यकीय तपासणी शासनाव्दारे किंवा स्थानिक प्राधिकरणाव्दारे चालविण्यात येणारे नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकाव्दारे किंवा त्यांचे अनुपस्थीत अन्य कोणत्याही वैद्यकीय व्यवसायीकेव्दारे (वैद्यकीय अधिकारी) करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

या कलमातील पोटकलमान्वये अशी वैद्यकीय तपासणी अपराधाची माहिती मिळालेपासुन २४ तासांचे आत केली पाहीजे. वैद्यकीय तपासणीसाठी पिडीत महिला अथवा तिचे वतीने सक्षम व्यक्तीने तपासणीची संमती देणे आवश्यक आहे. वैद्यकीय अहवालामध्ये पिडीत व्यक्तीचे व तिला तपासणीसाठी घेवुन जाणारे व्यक्तीचे नांव, वय व  पत्ता, संमती देणारे व्यक्तीचे नांव, वैद्यकीय तपासणीचा सविस्तर तपशिल व अभिप्राय, तपासणीसाठी देण्यात आलेल्या संमतीचा उल्लेख इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे.

# पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरझडती

**कलम १६५ पोलीस अधिका-याने पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात घ्यावयाची झडती :-** या कलमान्वये दखलपात्र अपराध दाखल झाले नंतर अशा अपराधाची संबधीत वस्तु, पुरावे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी असल्याची खात्री अथवा संशय असल्यास तपासी अंमलदार अशा ठिकाणाची विना वॉरंट झडती घेवुन अपराधाशी संबधीत असलेल्या वस्तु जप्त करू शकतो. काही कारणास्तव तपासी अधिकारी / अंमलदार समक्ष जावुन झडती घेण्यास असर्थ असल्यास अशा प्रसंगी दुय्यम / दुसरे अधिकारी / अंमलदार यांना संबधीत जागेची झडतीचा लेखी आदेश देवुन झडती करवुन घेवु शकतो. आदेशामध्ये जप्त झडतीचा उद्देश व स्वता झडती का घेवु शकत नाही. याचे कारण नमुद करणे आवश्यक आहे.

या कलमान्वये झडती घेतांना फौ.दं.प्र.सं. कलम १०० मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून झडती घेण्यात यावी.

# पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेरील घरझडती

**कलम १६६ पोलीस अधिका-याने पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रा बाहेर घ्यावयाची झडती :-** या कलमान्वये दखलपात्र अपराध दाखल झाले नंतर अशा अपराधाशी संबधीत वस्तु, पुरावे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर कोणत्याही ठिकाणी (भारत देशातील ठिकाण) असल्याची खात्री अथवा संशय असल्यास तपासी अंमलदार अशा संबधीत ठिकाणाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशच्या अधिकारी / अंमलदार यांना त्या ठिकाणाची विना वॉरंट झडती घेवुन अपराधाशी संबधीत असलेल्या वस्तु जप्त करवुन घेवु शकतो. अशा प्रसंगी झडती घेवुन त्या बाबतचा पंचनामा व पुरावे झडती घेणारे अधिकारी / अंमलदाराने संबधीत पोलीस ठाण्यात पाठवावे. अथवा हि प्रक्रीया विलंबाने होवु शकते, गुन्हयाशी संबधीत पुरावे / वस्तु यांचेत फेरफार / नष्ट होण्याची शक्यता तपासी अंमलदारास वाटली तर अशा प्रसंगी स्वता किंवा दुस-या अधिकारी/अंमलदाराला आदेश देवुन झडतीची प्रक्रीया पुर्ण करू शकतो.

या कलमान्वये झडती घेतांना फौ.दं.प्र.सं. कलम १०० मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून झडती घेण्यात यावी.

## भारत देशा बाहेरील झडती व दुस-या देशाचे विनंती वरून झडती

**कलम१६६ अ भारताबाहेरील देशाला तपास करण्याकरीता सक्षम अधिका-यास विनंती पत्र :-** या कलमान्वये दखलपात्र अपराधाचा तपास सुरू असतांना तपासी अधिका-याने / वरीष्ठ अधिका-याने न्यायालयास पत्रव्यवहार केला की या गुन्हयाशी संबधीत पुरावा / वस्तु भारताबाहेरील या देशात मिळु शकेल अशा प्रसंगी ते न्यायालय केंद्र सरकार ठरविल त्या पध्दतीने संबधीत देशातील न्यायालयास पत्रव्यवहार करून असा पुरावा / वस्तु संबधीत व्यक्तीकडुन हस्तगत करवुन घेणेसाठी विनंती पत्र पाठविल. या कलमान्वये केलेली कार्यवाही कलम १६५/१६६ प्रमाणे केलेल्या कार्यवाही प्रमाणे पुरावा म्हणुन मानली जाईल . **कलम १६६ ब भारताबाहेरील देशातील न्यायालयाकडुन अगर अधिका-याकडुन झडती संबधी विनंती पत्र (भारत देशाच्या क्रेद शासनास योग्य वाटल्यास) प्राप्त झाल्यावर करावयाची कार्यवाही :-** या कलमान्वये पत्र प्राप्त झाले नतंर न्यायालय स्वता अथवा संबधीत कार्यक्षेत्रातील पोलीस अधिकारी यांना झडती घेण्याचा आदेश देवु शकेल. अशी कारवाई वरील कलम १६६ प्रमाणे करावी.

# रिमांड

**कलम १६७ जेव्हा अन्वेषण चोवीस तासात संपवणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची प्रक्रीया :-** या कलमाचे पोट कलम १ अन्वये दखलपात्र अपराधाच्या अन्वेषणादरम्यान एखाद्या व्यक्तीला अटक करण्यात आले नंतर तीचे अटके पासुन चोविस तासाचे आत अन्वेषण शक्य होत नसल्यास तेव्हा तपासी अंमलदाराने त्याबाबत त्याचे रोजनाम्यात नोंद करून (केसडायरीमध्ये) आरोपीला अन्वेषणाकरीता पोलीस कोठडी / न्यायालयीन कोठडी मिळणे बाबत मा. न्यायालयाला रिपोर्ट सादर करून अटक व्यक्ती व रोजनामा न्यायालयासमक्ष/दंडाधिका-यांचे समक्ष हजर करावा.

पोटकलम २ अन्वये अटक व्यक्तीला ज्या दंडाधिका-यांकडे पाठविले आहे. त्यांना या प्रकारणाची संपरीक्षा करण्रयाचा अधिकार असो नसो. अशा दंडाधिका-यास योग्य वाटेल अशा हवालतीत एकुण जास्तीत जास्त १५ दिवस स्थानबध्द करण्याचा आदेश देईल. तसेच स्थानबध्द करण्याची आवश्यकता वाटत नसेल अशा वेळी संपरीक्षेचा अधिकार नसलेले दंडाधिकारी ज्यांना संपरीक्षा करण्याचा अधिकार आहे त्यांचेकडे पाठवुन देईल.

# रिमांड

**कलम १६७ :-** मृत्यु, अजिवन कारावास किंवा १० वर्ष शिक्षेची तरतुद असलेल्या अपराधासाठी एखाद्या व्यक्तीला अटक केली असल्यास अशा व्यक्तीला अपराधाचा अन्वेषण करण्यासाठी लागणारा ९० दिवसाचा कलावधी इतके दिसस स्थानबध्द करू शकतो. तसेच इतर अपराधातात ६० दिवस न्यायालयीन कोठडीत स्थानबध्द करता येईल. त्यानंतर असा व्यक्ती जामीन देत असल्यास त्याला जामीनावर अटीशर्तीचे अधिन राहुन न्यायालय सोडु शकते. तसेच अन्वेषणास लागणारे विलंबानुसार तपासी अंमलदार आरोपीताचे हवालातीमध्ये वाढ करणेची विनंती मा. न्यायालयाला केले नंतर न्यायालय त्यात वाढ करू शकते (जर अटक व्यक्तीला अपराधाचे अन्वेषणापेक्षा कमी कालावधीची रिमांड मंजुर केलेली असल्यास).

## तपास अहवाल व संशयीत आरोपीतास सोडुन देण्याचा अधिकार

**कलम १६८ दुय्यम पोलीस अधिका-याकडुन अन्वेषणाचा अहवाल:-** जेव्हा कोणत्याही दुय्यम पोलीस अधिका-याने या प्रकरणाखाली कोणतेही अन्वेषण केले असेल तेव्हा तो पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिका-याला अशा अन्वषणातुन काय निष्पन्न झाले त्याचा अहवाल देईल.

**कलम १६९ जेव्हा पुरावा अपुरे असेल तेव्हा अरोपीची बंधमुक्तता :-** जर एखाद्या दखलपात्र अपराधात अटक केलेल्या व्यक्तीचे विरूध्द तिचे अटकेपासुन २४ तासाचे आत त्याला दंडाधिकार-याकडे पाठविणे समर्थनिय होण्याइतपत पुरेसा पुरावा किंवा संशयास वाजवी आधार नाही. असे तपासाअंती निष्पन्न झााल्यास अशा व्यक्तीला अपराधाचे अन्वेषणादरम्यान तिला हजर राहण्याचा आदेश दिले नंतर हजर रहावे या अटीवर बंधमुक्त करण्याचा अधिकार तपासी अंमलदाराला या कलमान्वये अधिकार आहे.

**कलम १७० जेव्हा पुरावा पुरेसा असेल तेव्हा दंडाधिका-याकडे पाठवावयाची प्रकरणे :-** या कलमान्वये दखलपात्र अपराधाचे अन्वेषण पुर्ण झाले नंतर अपराधामधील आरोपील योग्य बंदोबस्तानिशी न्यायालयासमक्ष पोलीसांनी हजर करावे. जर आरोपीने जामीन दिला असुन त्याला जामीनावर मुक्त केले असेल अशा वेळी त्याने निश्चीत केलेल्या दिवशी न्यायालयामोर हजर राहणेचे बधंपत्र देणे गरजेचे आहे.

**कलम १७१ फिर्याददार किंवा साक्षीदार यांना पोलीस अधिका-याबरोबर जाण्यास भाग पाडता कामा नये व त्यांचेवर तसे निर्बंध लावता कामा नये :-** या कलमान्वये कोणत्याही फिर्यादीला अथवा साक्षीदाराला कोणत्याही न्यायालयात जाणेसाठी पोलीस अधिका-यांसोबत जाण्यास भाग पाडता कामा नये किंवा तशी जबरदस्ती करू नये. परंतु कोणताही फिर्यादी किंवा साक्षीदार समक्ष हजर राहण्यास किंवा कलम १७० प्रमाणे बधंपत्र निष्पादीत करून देण्यास नकार देईल अशा वेळी सुनावणी पुरी होईपर्यंत दंडाधिकारी त्याला हवालतीत स्थानबध्द करू शकेल.

# केसडायरी

**कलम १७२ अन्वेषण कार्यवाहीचा रोजनामा :-** या कलमान्वये अन्वेषण करणारे प्रत्येक पोलीस अंलदाराने अन्वेषणाचा रोजनामा लिहीला पाहीजे. त्या रोजनाम्यात त्याला खबर कधी मिळाली, कोणत्या वेळी त्याने अन्वेषणाला सुरवात केली व केव्हा संपवले. कोणत्या स्थळाला भेटी दिल्या, साक्षीदारांचे जबाब तसेच अन्वेषणासंबधीत केलेल्या सर्व कार्यवाहीची माहीती रोजनाम्यात लिहीली पाहीजे. या कलमातील पोटकलम १ अन्वये रोजनाम्यातील प्रत्येक पानाला पृष्ठ क्रमांक देवुन ती पुस्तक रूपात तयार केली पाहीजे. कोणत्याही अपराधाचे संपरीक्षेच्या वेळी न्यायालयाला असे रोजनामे मागविता येतील. त्याचा उपयोग पुरावा म्हणुन नाही तर मदत म्हणुन करता येईल. तपासाचा रोजनामा अरोपी अथवा अरोपीचे वकीलाला मागण्याचा हक्क नाही. साक्षीचे वेळेस तपासी अंमलदाराला त्याचे स्मृतीला उजाळा देण्यासाठी रोजनाम्याचा वापर करता येईल.

# दोषारोप पत्र

**कलम १७३ अन्वेषण पुर्ण झाल्यावर पोलीस अधिका-याचा अहवाल:-** या कलमान्वये अन्वेषण पुर्ण झाल्या नंतर अन्वेषणादरम्यान जमा केलेले सर्व कागदोपत्री पुरावे शासनाने विहीत केलेला अहवाल भरुन त्यामध्ये अन्वेषणाचा निष्कर्ष नमुद करुन न्यायालयात पाठवेल. लैगिंक अत्याचारासंबधीचा असा अहवाल अपराध दाखल झाले पासुन दोन महिन्यात पाठविला पाहिजे. न्यायलयात अहवाल पाठविले बाबत गुन्हयातील फिर्यादीस कळवेल तसेच अरोपीला आवश्यक नसतील असे कागदपत्र वगळुन अंतीम अहवालाचा एक संपुर्ण सेट आरोपीला देईल. तसेच तपासाअंतील काही आरोपीताचे हिताचा नसलेला व लोकहिताचा असलेला भाग आरोपी पक्षा समोर उघड न करणे बाबत मा. न्यायालयाला सविस्तर करणे नमुद केलेले निवेदन अहवालासोबत देवु शकतो.

# दोषारोप पत्र

**कलम १७३ अन्वेषण पुर्ण झाल्यावर पोलीस अधिका-याचा अहवाल:-**

अरोपीला बंधपत्रावर मुक्त केले आहे असे या कलमान्वये पाठविलेल्या अहवालावरून स्पष्ट होईल तेव्हा दंडाधिकारी हे त्यांना योग्य वाटेल त्या प्रमाणे असे बंधपत्र विसर्जित करण्याचा किंवा अन्य प्रकारचा आदेश देवु शकेल. असा अहवाल सादर केले नंतर तपासी अंलदाराला पुन्हा अन्वेषण करता येणार नाही. परंतु जास्तीचा पुरावा मिळुन आल्यास तो न्यायालयाला सादर करू शकतो.

# अकस्मात मृत्युचा तपास

**कलम १७४ आत्महत्या, इत्यादी बाबत पोलीसांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचा अधिकार :-** या कलमान्वये एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केली आहे. अपघातामुळे मयत झाली अथवा तिचा मृत्यु घडवुन आणला आहे. अन्य दुस-या व्यक्तीने तिचे मृत्यु संबधीचा अपराध केला आहे. अशा प्रसंगी घडलेल्या प्रकाराची चौकशी करण्याचे खास अधिकार राज्यशासनाने पोलीसांना दिले आहेत.अशा प्रकाराची खबर पोलीसांना मिळालेनंतर मरणान्वेषण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. अशा खबरीची माहिती तात्काळ जवळच्या कार्यकारी दंडाधिकारी यांना द्यावी. दोन योग्य पंचासमक्ष मयताचे मृतदेहाबाबचा सविस्तर मरोणात्तर पंचनामा करावा. मयताचे मरणाबाबचे प्राथमिक करण नमुद करून पोलीसांच्या अहवालाशी सहमत असणारे पंचाच्या त्यावर सहया घ्याव्यात.

# अकस्मात मृत्युचा तपास

**कलम १७४ आत्महत्या, इत्यादी बाबत पोलीसांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचा अधिकार :-** तसेच मृतदेहाची तपासणी करणे करीता जवळचे शासकीय शल्यचिकीत्सक यांचे कडे पाठवावा. अकस्मात मृत्युमध्ये लग्ना पासुन सात वर्षाचे आत एखादे महीलेचा मृत्यु झाल्यास तिचे मृत्युची चौकशी करतांना विशेष दक्षता घ्यावी.

अकास्मात मृत्युच्या संपुर्ण चौकशीचा अहवाल वरीष्ठ अधिका-यांचे मार्फतीने जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी यांचे कडेस मंजुरीसाठी पाठवावा.

# केसडायरी

**कलम १७५ व्यक्तींना समन्स पाठवण्याचा अधिकार :-** कलम १७४ खाली अन्वेषण करणा-या पोलीस अधिकारी अंमलदार यांनी अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ घटनेशी परीचित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला चौकशी साठी बोलावणे करीता समन्स पाठविण्याचा अधिकार या कलमान्वये आहे. अशा चौकशी मध्ये घडलेला सर्व प्रकाराबाबत खरेपणाने अन्वेषण अधिकारी यांना सांगण्यास बांधलेली असते.

**कलम १७६ मृत्युच्या कारणाची चौकशी करण्याचा दंडाधिकरी यांचा अधिकार :-** या कलमान्वये एखाद्या इसमाचे / महीलेच्या संशयीत मृत्युची, पोलीस हवलातील इसमाच्या मृत्युची, अथवा मृत्यु नंतर जिला पुरण्यात आले आहे अशा व्यक्तीच्या मृत्युची चौकशी करण्याचे अधिकार दंडाधिका-यांना आहे. एखाद्या प्रकरणात असा पुरलेला मृतदेह उकरून अन्वेषण करावयाचे असल्यसास दंडाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय असा मृत्युदेह उकरू नये.

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....